स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## पर्यावरण विभाग

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१
ई-मेल : save.environs@mbmc.gov.in

जा.क्र.मनपा/पर्यावरण/ ९० /२०२४-२५ दि. ०२/०४/२०२४

**प्रति,**
**सिस्टीम मॅनेजर**
**संगणक विभाग**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**विषय :- गणेशोत्सव २०२४ पर्यावरणपूरक साजरा करणेबाबतच्या मार्गदर्शक सूचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द प्रसिद्ध करणेबाबत.**

उपरोक्त विषयांन्वये आगामी गणेशोत्सव २०२४ च्या पार्श्वभूमीवर पर्यावरणाच्या संरक्षणासोबतच शाश्वत पद्धतीने पर्यावरणपूरक उत्सव साजरा करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ, मुर्तिकार, संग्रहक, वितरक, विक्री केंद्र तसेच वैयक्तिक (घरगुती गणपती) यांच्यासाठी मार्गदर्शक सुचना प्रसिद्ध करण्यात आलेल्या आहेत.

तरी सदर मार्गदर्शक सुचनांना मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व वर्तमानपत्रात प्रसिध्दी देण्यात यावी.

Gunijan

**(योगेश गुणिजन)**
**सहा. आयुक्त (पर्यावरण)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव :-**
**जनसंपर्क अधिकारी,**
जनसंपर्क विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## पर्यावरण विभाग

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१
ई-मेल : save.environs@mbmc.gov.in

जा.क्र.मनपा/पर्यावरण/ ०२ /२०२४-२५ दि. ०२/०८/२०२४

**विषय :- गणेशोत्सव २०२४ च्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करण्याबाबत.**

**संदर्भ :- १. मा. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडील दि. १२ मे २०२२ रोजीच्या मार्गदर्शक सूचना.**
**२. मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेकडील MPCB/JD(WPC)/B-240221-FTS-0088, दि. २१/०२/२०२४ रोजीचे पत्र.**

आगामी गणेशोत्सवांच्या पार्श्वभूमीवर पर्यावरणाच्या संरक्षणासोबतच शाश्वत पद्धतीने पर्यावरणपूरक उत्सव साजरा करण्यासाठी मिरा भाईंदर महानगरपालिका कटिबद्ध आहे.

खालील नमूद केलेली मार्गदर्शक तत्वे विशेषत: प्लास्टर ऑफ पॅरिसच्या (पीओपी) मूर्तींवर प्रभावीपणे बंदी घालण्यासाठी आणि पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी निर्गमित करण्यात येत आहेत. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने दि. १२ मे २०२२ रोजी जारी केलेल्या मूर्ती विसर्जनाच्या सुधारित मार्गदर्शक तत्त्वांच्या आधारे ही मार्गदर्शक तत्वे तयार करण्यात आलेली आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका सर्व निवासी कल्याणकारी संघटना, मूर्तीकार आणि कुटुंबांना आवाहन करते की, त्यांनी उत्सवांपूर्वी, उत्सवादरम्यान व उत्सवानंतर या मार्गदर्शक तत्वांचे काटेकोरपणे पालन करावे, जेणेकरून उत्सवांचा पर्यावरणावर होणारा नकारात्मक परिणाम कमी होईल.

१. मूर्तिकार :-

- प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) आणि प्लास्टिक, थर्माकॉल (पॉलिस्टीरिन) आणि कृत्रिम रंगांपासून बनवलेल्या सजावटीच्या वस्तू यासारखे हानिकारक पदार्थ टाळणे बंधनकारक आहे.
- मूर्तीकारांनी माती (विशेषत: शाडू माती) यांसारख्या पारंपरिक साहित्यांचा आणि कागदी लगदा यासारख्या पर्यावरणपूरक साहित्यांचा वापर करावा.
- मूर्तिकारांनी सन २०२४ मध्ये येणाऱ्या गणेशोत्सवांसाठी किती मूर्ती तयार करावयाच्या आहेत, याची सविस्तर माहिती महानगरपालिकेला देणे आवश्यक आहे. चार फूट उंचीपर्यंतच्या सर्व घरगुती व सार्वजनिक मूर्ती शाडू माती किंवा इतर पर्यावरणपूरक साहित्यांपासून तयार करणे बंधनकारक आहे.
- मूर्तिकारांनी शाडू माती किंवा पर्यावरणपूरक मूर्तीच्या उजव्या खांद्याच्या मागील बाजूस एक इंचाचे हिरवे वर्तुळ लावून चिन्हांकित करावे.
- मूर्तिकारांनी हानिकारक रंगांऐवजी नैसर्गिक / पर्यावरणपूरक रंगद्रव्यांचा वापर करावा.
- उपरोक्त सूचनांचे पालन व्हावे यासाठी महानगरपालिकेची प्रभाग समिती निहाय पथके प्रत्यक्ष तपासणी करणार आहेत.

२. **वितरक / संग्रहक / मुर्ती विक्री केंद्रे :-**

- प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी), थर्माकॉल/पॉलिस्टीरीन आणि हानिकारक रंगांच्या मूर्तींचे प्रदर्शन काटेकोरपणे टाळून पारंपारिक शाडू माती (विशेषतः ४ फूट उंचीपर्यंतच्या मूर्ती), कागदी लगदा इ. पर्यावरणपूरक वस्तूंपासून बनविलेल्या मूर्तींचे वितरण करण्यात यावे.
- सन २०२४ मध्ये येणाऱ्या गणेशोत्सवांसाठी किती मूर्ती साठवायच्या आहेत, याची सविस्तर माहिती वितरकांनी महानगरपालिकेला देणे आवश्यक आहे. तसेच सार्वजनिक वापरासाठी किती मूर्ती साठवल्या आहेत, याची अचूक माहिती मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या संबंधित प्रभाग समिती कार्यालयांना सादर करणे आवश्यक आहे.
- वितरकांनी आपल्या मंडपाबाहेर ३ X ५ आकाराचा **"येथे पर्यावरणपूरक साहित्याने (शाडू माती) बनविलेल्या मूर्ती उपलब्ध आहेत"** असा फलक लावावा. प्लॅस्टिक पॅकेजिंगचा कमीत कमी वापर करुन शक्य तेथे विघटनशिल पर्यायांचा वापर करावा.
- मूर्ती उत्पादन, विक्री आणि विल्हेवाट यासंदर्भात सर्व शासकीय नियमांचे पालन करावे.

३. **सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ :-**

- प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी), थर्माकोल/पॉलिस्टीरीन आणि हानिकारक रंगांपासून बनविलेल्या मूर्ती खरेदी करणेत येऊ नये तसेच सदर मुर्तीची उंची ४ फूटांपेक्षा कमी असावी. मूर्ती ही पारंपारिक शाडू माती, कागदी लगदा इ. पर्यावरणपूरक वस्तूंपासून बनविलेली असावी.
- सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने बॅनर, पोस्टर आदींसह प्लॅस्टिक आधारित सजावटीचा वापर टाळून त्याऐवजी कापड, पुनर्वापर केलेला कागद लगदा इ. पर्यावरणपूरक साहित्याने मंडप सजवावेत.
- उत्सवादरम्यान निर्माण होणारे सर्व निर्माल्याचे वर्गीकरण करुन योग्य ती विल्हेवाट लावली जाईल याची खात्री करावी.
- सेंद्रिय (निर्माल्य) आणि नॉन-बायोडिग्रेडेबल वस्तूंच्या संग्रहासाठी स्वतंत्र रंगीत कोटेड डब्बे वापरावे.
- प्लास्टिक पिशव्या, बाटल्या, यांसारख्या सिंगल युज प्लॅस्टिकच्या वापरावर सक्त मनाई आहे.
- सार्वजनिक गणपती मंडळांनी आपल्या आवारात महानगरपालिकेने बांधलेल्या तात्पुरत्या/कृत्रिम तलावांमध्येच मूर्तीचे विसर्जन होईल याचे नियोजन करावे.
- ध्वनी प्रणालीचे प्रमाण मर्यादित ठेवून आणि लाऊडस्पीकरसाठी निश्चित केलेल्या वेळेचे पालन करून ध्वनी प्रदूषण नियमांचे पालन करावे.

४. **वैयक्तिक (घरगुती) गणपती :-**

- पीओपीनिर्मित मूर्तीऐवजी शाडू माती, कागदी लगदा किंवा इतर पर्यावरणपूरक पर्यायांपासून बनवलेल्या मूर्ती खरेदी कराव्यात.
- शहरातील सर्व वैयक्तिक कुटुंबांनी आपापल्या आवारातील महानगरपालिकेच्या कृत्रिम तलावांमध्ये गणेश मूर्तींचे विसर्जन करणे बंधनकारक आहे.
- निर्माल्य किंवा अविघटनशिल वस्तूंच्या संग्रहासाठी स्वतंत्र रंगीत कोटेड डब्बे वापरा.
- उत्सवानंतर, पर्यावरणावर होणारा परिणाम कमी करण्यासाठी कागद आणि पुठ्ठयांच्या सजावटीचा जबाबदारीने पुनर्वापर किंवा विल्हेवाट लावावी. पुनर्वापर न होणाऱ्या वस्तूंपासून पुनर्वापर योग्य वस्तू वेगळ्या कराव्यात आणि स्थानिक कचऱ्याची विल्हेवाट लावण्याच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करावे.
- प्लॅस्टिक प्रदूषण रोखण्यासाठी प्लॅस्टिकची सजावट / शृंगार करणे टाळावे.

**मिरा भाईंदर कार्यक्षेत्रामध्ये गणेशोत्सवासाठी पर्यावरणपूरक उपाययोजनांची अंमलबजावणी**

- **कृत्रिम (तात्पुरते) विसर्जन तलावांची निर्मिती** :- महानगरपालिकेतर्फे शहरातील विविध सार्वजनिक ठिकाणी किंवा जलस्त्रोतांच्या जवळ मूर्ती विसर्जनासाठी तात्पुरते तलाव उभारले जातील. या सुविधांमध्ये कचरा संकलन आणि साठवणुकीसाठी आवश्यक तरतुदी असतील, स्वच्छ आणि पर्यावरणपूरक विसर्जनास प्रोत्साहन दिले जाईल.
- **कचरा संकलन व विल्हेवाट** :- मूर्ती विसर्जन स्थळांमधून निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे वेळेत संकलन आणि सुरक्षित विल्हेवाट लावण्याची खात्री महानगरपालिकेमार्फत गणेशोत्सव पूर्ण झाल्यानंतर २४ तासांच्या आत करण्यात येईल.
- **कचरा विलगीकरण** :- विघटनशिल आणि अविघटनशिल कचऱ्याचे संकलन आणि विलगीकरण करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत मूर्ती विसर्जन स्थळी स्वतंत्र रंगीत कोटेड डब्बे उपलब्ध करून देण्यात येतील.
- **गाळाची विल्हेवाट** :- मूर्ती विसर्जनानंतर तलावातील गाळाची विल्हेवाट महानगरपालिकेमार्फत शास्त्रोक्त पद्धतीने करण्यात येईल किंवा मूर्तीकार संघटनांना पर्यायाने नवीन मूर्ती तयार करण्यासाठी गाळाचा पुनर्वापर करणे बंधनकारक केले जाईल, ज्यामुळे शाश्वत संसाधनांचा वापर होण्यास हातभार लागेल.
- **जनजागृती अभियान** :- मिरा भाईंदर महानगरपालिका करणार व्यापक जनजागृती मूर्ती निर्मितीसाठी नैसर्गिक, बायोडिग्रेडेबल आणि पर्यावरणपूरक कच्च्या मालाच्या वापरास प्रोत्साहन देण्याची मोहीम, प्लास्टर ऑफ पॅरिसपासून (पीओपी) बनवलेल्या मूर्तीवर पूर्णत: बंदी घालण्यात येत असून नागरिकांना पर्यावरणपूरक पद्धतींचे पालन करण्यास प्रोत्साहित केले जाणार आहे.

पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ अन्वये उत्सवादरम्यान नागरिकांनी आणि मूर्तीकारांनी पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आणि पर्यावरणपूरक पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी उपरोक्तप्रमाणे मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक असून नियमांचे उल्लंघन केल्यास दंड आकारला जाईल.

(संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से)
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

O/C

# मिरा भाईंदर महानगरपालिका
# पर्यावरण विभाग

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१
ई-मेल : save.environs@mbmc.gov.in

जा.क्र.मनपा/पर्यावरण/ ०४ /२०२४-२५ दि. ०२/०४/२०२४

**प्रति,**

-----------------------------------

-----------------------------------

-----------------------------------

**विषय : गणेशोत्सव २०२४ च्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करण्याबाबत.**

**संदर्भ : १. मा. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडील दि. १२ मे २०२२ रोजीच्या मार्गदर्शक सूचना.**
**२. मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेकडील MPCB/JD(WPC)/B-240221-FTS-0088, दि. २१/०२/२०२४ रोजीचे पत्र.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात पर्यावरणपूरक गणेशोत्सव २०२४ साजरा करण्याबाबत भाविकांना / मूर्तीकारांना / गणेशमूर्ती साठवणूकदार यांचेकरिताच्या मार्गदर्शक सूचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

सबब, मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांनी** खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचनांचे पालन करणे बंधनकारक आहे.

- प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी), थर्माकोल/पॉलिस्टीरीन आणि हानिकारक रंगांपासून बनविलेल्या मूर्ती खरेदी करणेत येऊ नये तसेच सदर मुर्तीची उंची ४ फूटांपेक्षा कमी असावी. मूर्ती ही पारंपारिक शाडू माती, कागदी लगदा इ. पर्यावरणपूरक वस्तूंपासून बनविलेली असावी.
- सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाने बॅनर, पोस्टर आदींसह प्लॅस्टिक आधारित सजावटीचा वापर टाळून त्याऐवजी कापड, पुनर्वापर केलेला कागद लगदा इ. पर्यावरणपूरक साहित्याने मंडप सजवावेत.
- उत्सवादरम्यान निर्माण होणारे सर्व निर्माल्याचे वर्गीकरण करुन योग्य ती विल्हेवाट लावली जाईल याची खात्री करावी.
- सेंद्रिय (निर्माल्य) आणि नॉन-बायोडिग्रेडेबल वस्तूंच्या संग्रहासाठी स्वतंत्र रंगीत कोटेड डब्बे वापरावे.
- प्लास्टिक पिशव्या, बाटल्या, यांसारख्या सिंगल युज प्लॅस्टिकच्या वापरावर सक्त मनाई आहे.
- सार्वजनिक गणपती मंडळांनी महानगरपालिकेने बांधलेल्या तात्पुरत्या/कृत्रिम तलावांमध्येच मूर्तीचे विसर्जन होईल याचे नियोजन करावे.
- ध्वनी प्रणालीचे प्रमाण मर्यादित ठेवून आणि लाऊडस्पीकरसाठी निश्चित केलेल्या वेळेचे पालन करून ध्वनी प्रदूषण नियमांचे पालन करावे.

पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ अन्वये उत्सवादरम्यान नागरिकांनी आणि मूर्तीकारांनी पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आणि पर्यावरणपूरक पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी उपरोक्तप्रमाणे मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक असून नियमांचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल याची नोंद घ्यावी.

**(संजय श्रीपतराव काटकर,** भा.प्र.से.**)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## पर्यावरण विभाग

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१
ई-मेल : save.environs@mbmc.gov.in

जा.क्र.मनपा/पर्यावरण/ ०५ /२०२४-२५ दि. ०२/०८/२०२४

प्रति,

-----------------------------------

-----------------------------------

-----------------------------------

**विषय : गणेशोत्सव २०२४ च्या मार्गदर्शक तत्वांची अंमलबजावणी करण्याबाबत.**

**संदर्भ : १. मा. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडील दि. १२ मे २०२२ रोजीच्या मार्गदर्शक सूचना.**

**२. मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेकडील MPCB/JD(WPC)/B-240221-FTS-0088, दि. २१/०२/२०२४ रोजीचे पत्र.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात पर्यावरणपूरक गणेशोत्सव २०२४ साजरा करण्याबाबत भाविकांना / मूर्तीकारांना / गणेशमूर्ती साठवणूकदार यांचेकरिताच्या मार्गदर्शक सूचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

सबब, मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **मूर्तिकारांनी** खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचनांचे तंतोतत पालन करणे आवश्यक आहे.

- प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी) आणि प्लास्टिक, थर्माकॉल (पॉलिस्टीरिन) आणि कृत्रिम रंगांपासून बनवलेल्या सजावटीच्या वस्तू यासारखे हानिकारक पदार्थ टाळणे बंधनकारक आहे.
- मूर्तीकारांनी माती (विशेषत: शाडू माती) यांसारख्या पारंपरिक साहित्यांचा आणि कागदी लगदा यासारख्या पर्यावरणपूरक साहित्यांचा वापर करुन मुर्ती तयार करावी.
- मूर्तिकारांनी सन २०२४ मध्ये येणाऱ्या गणेशोत्सवांसाठी किती मूर्ती तयार करणार आहात, याची सविस्तर माहिती महानगरपालिकेला देणे आवश्यक आहे. तसेच चार फूट उंचीपर्यंतच्या सर्व घरगुती व सार्वजनिक मंडळासाठी मूर्ती शाडू माती किंवा इतर पर्यावरणपूरक साहित्यांपासून तयार करणे बंधनकारक आहे.
- मूर्तिकारांनी शाडू माती किंवा पर्यावरणपूरक मूर्तीच्या उजव्या खांद्याच्या मागील बाजूस एक इंचाचे हिरवे वर्तुळ लावून चिन्हांकित करावे.
- मूर्तिकारांनी हानिकारक रंगांऐवजी नैसर्गिक / पर्यावरणपूरक रंगद्रव्यांचा वापर करावा.
- उपरोक्त सूचनांचे पालन होण्याकरिता महानगरपालिकेची प्रभाग समिती निहाय पथके प्रत्यक्ष तपासणी करणार आहेत.

उपरोक्त सर्व बाबी विचारात घेऊन मुर्तीकारांनी पर्यावरणपूरक मुर्ती तयार करणे बंधनकारक आहे. सदर मार्गदर्शक सूचनांचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्यास नियमानुसार कारवाई करणेत येईल, याची नोंद घ्यावी.

**(संजय श्रीपतराव काटकर,भा.प्र.से.)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## पर्यावरण विभाग

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१
ई-मेल : save.environs@mbmc.gov.in

जा.क्र.मनपा/पर्यावरण/ ०६ /२०२४-२५ दि. ०२/०४/२०२४

**प्रति,**

-----------------------------------

-----------------------------------

-----------------------------------

**विषय : गणेशोत्सव २०२४ च्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करण्याबाबत.**

**संदर्भ : १. मा. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडील दि. १२ मे २०२२ रोजीच्या मार्गदर्शक सूचना.**
**२. मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेकडील MPCB/JD(WPC)/B-240221-FTS-0088, दि. २१/०२/२०२४ रोजीचे पत्र.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात पर्यावरणपूरक गणेशोत्सव २०२४ साजरा करण्याबाबत भाविकांना / मूर्तीकारांना / गणेशमूर्ती साठवणूकदार यांचेकरिताच्या मार्गदर्शक सूचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

सबब, मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **वितरक / संग्रहक / मुर्ती विक्री केंद्रांनी** खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे.

- प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी), थर्माकॉल/पॉलिस्टीरीन आणि हानिकारक रंगांच्या मूर्तींचे प्रदर्शन काटेकोरपणे टाळून पारंपारिक शाडू माती (विशेषतः ४ फूट उंचीपर्यंतच्या मूर्ती), कागदी लगदा इ. पर्यावरणपूरक वस्तूंपासून बनविलेल्या मूर्तींचे वितरण / विक्री करणे बंधनकारक आहे.
- सन २०२४ मध्ये येणाऱ्या गणेशोत्सवांसाठी किती मूर्ती विक्री करणार आहेत, याची सविस्तर माहिती वितरकांनी महानगरपालिकेला देणे आवश्यक आहे. तसेच सार्वजनिक वापरासाठी किती मूर्ती साठवल्या आहेत, याची अचूक माहिती मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या संबंधित प्रभाग समिती कार्यालयांना सादर करणे आवश्यक आहे.
- वितरकांनी आपल्या मंडपाबाहेर ३ X ५ आकाराचा **"येथे पर्यावरणपूरक साहित्याने (शाडू माती) बनविलेल्या मूर्ती उपलब्ध आहेत"** असा फलक लावावा. प्लॅस्टिक पॅकेजिंगचा वापर करता येणार नाही त्याऐवजी विघटनशिल पर्यायांचा वापर करावा.
- मूर्ती उत्पादन, विक्री आणि विल्हेवाट यासंदर्भात उपरोक्त मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे.

पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ अन्वये उत्सवादरम्यान नागरिकांनी आणि मूर्तीकारांनी पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आणि पर्यावरणपूरक पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी उपरोक्तप्रमाणे मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक असून नियमांचे उल्लंघन केल्यास दंडात्मक कारवाई केली जाईल, याची नोंद घ्यावी.

**(संजय श्रीपतराव काटकर,भा.प्र.से.)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## पर्यावरण विभाग

स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि.ठाणे - ४०१ १०१
ई-मेल : save.environs@mbmc.gov.in

जा.क्र.मनपा/पर्यावरण/ ०७ /२०२४-२५ दि. 02 /08 /२०२४

**प्रति,**

-----------------------------------

-----------------------------------

-----------------------------------

**विषय : गणेशोत्सव २०२४ च्या मार्गदर्शक तत्त्वांची अंमलबजावणी करण्याबाबत.**

**संदर्भ : १. मा. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाकडील दि. १२ मे २०२२ रोजीच्या मार्गदर्शक सूचना.**
**२. मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांचेकडील MPCB/JD(WPC)/B-240221-FTS-0088, दि. २१/०२/२०२४ रोजीचे पत्र.**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रात पर्यावरणपूरक गणेशोत्सव २०२४ साजरा करण्याबाबत भाविकांना / मूर्तीकारांना / गणेशमूर्ती साठवणूकदार यांचेकरिताच्या मार्गदर्शक सूचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर व स्थानिक वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात आलेल्या आहेत.

सबब, मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील **वैयक्तिक (घरगुती) गणेशमूर्ती आणणाऱ्या कुटुंबांना** खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचनांचे पालन करावे.

- पीओपीनिर्मित मूर्तीऐवजी शाडू माती, कागदी लगदा किंवा इतर पर्यावरणपूरक पर्यायांपासून बनवलेल्या मूर्ती खरेदी कराव्यात.
- शहरातील सर्व वैयक्तिक कुटुंबांनी आपापल्या आवारातील महानगरपालिकेच्या कृत्रिम तलावांमध्ये गणेश मूर्तींचे विसर्जन करणे बंधनकारक आहे.
- निर्माल्य किंवा अविघटनशिल वस्तूंच्या संग्रहासाठी स्वतंत्र रंगीत कोटेड डब्बे वापरा.
- उत्सवानंतर, पर्यावरणावर होणारा परिणाम कमी करण्यासाठी कागद आणि पुठ्ठयांच्या सजावटीचा जबाबदारीने पुनर्वापर किंवा विल्हेवाट लावावी. पुनर्वापर न होणाऱ्या वस्तूंपासून पुनर्वापर योग्य वस्तू वेगळ्या कराव्यात आणि स्थानिक कचऱ्याची विल्हेवाट लावण्याच्या मार्गदर्शक तत्त्वांचे पालन करावे.
- प्लॅस्टिक प्रदूषण रोखण्यासाठी प्लॅस्टिकची सजावट / श्रृंगार करणे टाळावे.

पर्यावरण संरक्षण कायदा, १९८६ अन्वये उत्सवादरम्यान नागरिकांनी आणि मूर्तीकारांनी पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी आणि पर्यावरणपूरक पद्धतींना प्रोत्साहन देण्यासाठी उपरोक्तप्रमाणे मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक असून नियमांचे उल्लंघन केल्यास दंड आकारला जाईल.

**(संजय श्रीपतराव काटकर,भा.प्र.से.)**
**आयुक्त**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

o/c